# Regional Marathi Text Bulletin, Aurangabad

Date – 09 October 2023

Time 18.10 to 18.20

Language Marathi

**आकाशवाणी औरंगाबाद**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक – ०९ ऑक्टोबर २०२३ सायंकाळी ६.१०**

************

- मध्यप्रदेश आणि राजस्थानसह पाच राज्यांमध्ये येत्या नोव्हेंबर महिन्यात विधानसभा निवडणुका
- परळीच्या वैद्यनाथ ज्योतिर्लिंग तीर्थक्षेत्र विकासासाठी २८६ कोटीं रुपयांच्या सुधारित आराखड्यास मान्यता
- छत्रपती संभाजीनगर तसंच नांदेड इथल्या शासकीय रुग्णालयांचा माजी मंत्री आदित्य ठाकरे यांच्याकडून आढावा

आणि

- महाविद्यालयांमध्ये निवडणूक साक्षर मंडळाची स्थापना करण्याची आवश्यकता लातूरच्या जिल्हाधिकाऱ्यांकडून व्यक्त

****

मध्यप्रदेश आणि राजस्थानसह पाच राज्यांमध्ये येत्या नोव्हेंबर महिन्यात विधानसभा निवडणुका होणार आहेत. मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांनी आज नवी दिल्लीत पत्रकार परिषदेत ही घोषणा केली. मध्यप्रदेशात १७ नोव्हेंबर, राजस्थान २३ नोव्हेंबर, मिझोराम ७ आणि तेलंगणात ३० नोव्हेंबर रोजी मतदान होईल. छत्तीसगडमध्ये दोन टप्प्यात ७ आणि १७ नोव्हेंबरला मतदान होणार आहे. या सर्व राज्यांमधील निवडणुकीचे निकाल तीन डिसेंबर रोजी जाहीर होतील. २०२४ मध्ये लोकसभा निवडणुकांपूर्वी होणाऱ्या या शेवटच्या विधानसभा निवडणुका असल्याने त्यांना विशेष महत्त्व असल्याचं राजीव कुमार म्हणाले.

****

आशियाई खेळांमध्ये सहभागी झालेल्या भारतीय खेळाडूंशी पंतप्रधान नरेंद्र मोदी उद्या नवी दिल्लीत संवाद साधणार आहेत. सर्व खेळाडू, त्यांचे प्रशिक्षक, भारतीय ऑलिम्पिक संघटनेचे अधिकारी आणि राष्ट्रीय क्रीडा महासंघांचे प्रतिनिधी या कार्यक्रमात सहभागी होणार आहेत.

****

ज्येष्ठ लेखक आणि विचारवंत हेरंब कुलकर्णी यांच्यावर हल्ला करणाऱ्या हल्लेखोरांना तत्काळ अटक करण्याचे निर्देश मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी अहमदनगर पोलीस अधीक्षकांना दिले आहेत. कुलकर्णी यांच्यावर गेल्या शनिवारी तीन अज्ञात हल्लेखोरांनी हल्ला केला होता. मुख्यमंत्र्यांनी या घटनेची तत्काळ दखल घेऊन कुलकर्णी यांच्या प्रकृतीची दूरध्वनीवरुन चौकशी केली, तसंच पोलिस विभागाला तत्काळ कारवाईचे निर्देश दिले.

****

बीड जिल्ह्यातल्या परळी इथल्या वैद्यनाथ ज्योतिर्लिंग तीर्थक्षेत्र विकासासाठी २८६ कोटीं रुपयांच्या सुधारित आराखड्यास मान्यता देण्यात आली आहे. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखालील शिखर समितीच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. वैद्यनाथ तीर्थक्षेत्र विकासाचा मूळ आराखडा हा १३३ कोटींचा होता. मात्र, मंदिरात दगडी भिंती बांधून जीर्णोद्धार करणं, तसंच भक्तांसाठी प्रतीक्षालय अशा एकूण ९२ कामांसाठी निधीमध्ये वाढ करण्यात आली. दुरुस्तीची जबाबदारी मंदिर समितीसह परळी नगर परिषदेने घ्यावी, ठिकठिकाणी दाट सावली देणारी झाडे लावावीत, पाय घसरणार नाहीत अशा फरश्यांचा वापर पायऱ्यांसाठी करावा अशा सूचना यावेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केल्या.

****

देशव्यापी "मेरी माटी-मेरा देश" अभियान हुतात्मा सैनिकांना समर्पित असल्याचं केंद्रीय आरोग्य राज्यमंत्री डॉ. भारती पवार यांनी म्हटलं आहे. या अभियाना अंतर्गत आज नाशिक जिल्ह्यातल्या दिंडोरी तालुक्यात अमृत कलश यात्रा काढण्यात आली, त्यावेळी त्या बोलत होत्या. अमृतकलश यात्रेमध्ये ज्याप्रमाणे सर्वांनी एकत्रित येऊन काम केलं, त्याचप्रमाणे केंद्र आणि राज्य सरकारच्या योजना सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी प्रयत्न करण्याचं आवाहन त्यांनी केलं. यावेळी उपस्थितांना पंचप्रण शपथ देण्यात आली.

****

राज्यात नांदेडसह औरंगाबाद, नागपूर आदी ठिकाणच्या शासकीय रुग्णालयांमध्ये मोठ्या प्रमाणावर रुग्णांचे मृत्यू होत असताना, सरकारने औषधी खरेदीसाठी स्थापन केलेले स्वतंत्र प्राधिकरण नेमकं काय करतय, असा सवाल माजी मंत्री तथा शिवसेना नेते आदित्य ठाकरे यांनी केला आहे. ठाकरे यांनी आज नांदेड इथं शासकीय रुग्णालयास भेट देऊन परिस्थितीचा आढावा घेतला. त्यानंतर पत्रकार परिषदेत ते बोलत होते. विधान परिषदेतील विरोधी पक्षनेते अंबादास दानवे, यांच्यासह अनेक मान्यवर यावेळी उपस्थित होते.

दरम्यान, आदित्य ठाकरे यांनी आज सकाळी छत्रपती संभाजीनगर इथल्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालय–घाटीला भेट देऊन रुग्णांची संख्या, औषधांची उपलब्धता याविषयी माहिती घेतली. त्यानंतर पत्रकार परिषदेत बोलताना, आपण फक्त आरोप करण्यासाठी नाही तर परिस्थिती समजून घेण्यासाठी आणि त्यातून मार्ग काढण्यासाठी आलो असल्याचं ठाकरे यांनी सांगितलं.

****

महाविकास आघाडी सरकारने अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांसाठी २४ जिल्ह्यात ३० स्पर्धा परीक्षा प्रशिक्षण केंद्रं सुरु केली होती, ही केंद्र बंद असल्याचा आरोप विधानसभेतले विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी केला आहे. ही केंद्रं सुरू करण्यात यावीत, अशी मागणी करणारं पत्र त्यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना पत्राद्वारे केली आहे. राज्यातील ७८ हजार विद्यार्थी स्पर्धा परीक्षा प्रशिक्षणापासून वंचित असल्याचं त्यांनी पत्रात म्हटलं आहे.

****

दक्षिण मध्य रेल्वेनं चार नवीन रेल्वे गाड्या सुरु केल्या आहेत. केंद्रीय पर्यटन मंत्री जी किशन रेड्डी यांन आज सिकंदराबाद रेल्वे स्थानकावर काझिपेट ते पुणे या रेल्वे गाडीला हिरवा झेंडा दाखवून रवाना केलं. तसंच त्यांनी दूरदृश्य प्रणालीच्या माध्यमातून रायचूर – नांदेड, कुरनूल – जयपूर आणि बोधन – करीमनगर या गाड्यांची देखील सुरुवात केली.

****

जागतिक टपाल दिनानिमित्त बीड इथल्या टपाल कार्यालयात आजपासून राष्ट्रीय टपाल सप्ताहास प्रारंभ झाला. यंदाच्या जागतिक टपाल दिनाची संकल्पना टुगेदर फॉर ट्रस्ट अशी आहे. १३ ऑक्टोबरपर्यंत चालणाऱ्या या सप्ताहात नागरिकांनी

जवळच्या टपाल कार्यालयात भेट देऊन डाक विभागाच्या विविध योजनांचा लाभ घ्यावा असं आवाहन बीड डाक विभागाचे डाक अधीक्षक डी. आर. शिवणीकर यांनी केलं आहे.

आणि आता ऐकू या, टपाल दिनानिमित्त आमचे प्रतिनिधी समीर पाठक यांनी लिहिलेला हा वृत्तांत –

***कधी शुभ वार्ता तर कधी दुःखद बातमी, कधी गावात राहणाऱ्या वृद्ध आईला मुलाने शहरातून पाठवलेली मनी ऑर्डर तर कधी वयोवृद्धांना वाचून दाखवलेलं पत्र…***

***वेड्यावाकड्या रस्त्यांवरून सायकल चालवत, घंटीने वर्दी देत, थेट घरापर्यंत सेवा देणारा तोच मागच्या पिढीच्या जिवाभावाचा पोस्टमन. आजच्या भारतीय टपाल दिनी त्याची आठवण नक्कीच निघणार कारण प्रत्येक भारतीयांच्या भल्याबुऱ्या आठवणींचे तेच तर पहिले साक्षीदार होते. घराघरातल्या सर्वांशीच त्यांचा अव्यक्त संवाद होत असे. आज मात्र, संवादाची साधनं प्रचंड वाढलेली असतानाही,  सुखद संवाद घडतो का, हा प्रश्न अनुत्तरीतच राहतो..***

****

महाविद्यालय आणि विद्यापीठातील विद्यार्थ्यांमध्ये निवडणूक साक्षरता जनजागृतीचा प्रचार आणि प्रसार होण्यासाठी महाविद्यालयांमध्ये निवडणूक साक्षर मंडळाची स्थापना करण्याची आवश्यकत असल्याचं मत लातूरच्या जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर घुगे यांनी व्यक्त केलं आहे. जिल्ह्यामध्ये निवडणूक साक्षरता मंडळ स्थापन करण्यासंदर्भात आज लातूर इथं बैठक झाली त्यावेळी त्या बोलत होत्या. जिल्ह्यातील सर्व पात्र नागरिकांचे मतदार यादीमध्ये नाव समाविष्ट करण्यासाठी विशेष मोहिम सुरु आहे. त्याअंतर्गत लातूरचं जिल्हा निवडणूक अधिकारी कार्यालय आणि वर्शिप अर्थ फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्ह्यातील प्रत्येक महाविद्यालयात निवडणूक साक्षरता मंडळ स्थापन करण्यात येणार आहे. निवडणूक साक्षर मंडळामधे अधिकाधिक विद्यार्थ्यांनी सहभागी व्हावं असं आवाहन जिल्हाधिकाऱ्यांनी यावेळी केलं.

****

धनगर समाजाच्या अनुसूचित जमातीच्या आरक्षणाच्या अंमलबजावणीच्या मागणीसाठी सकल धनगर समाज बांधवांच्या वतीने बीड जिल्ह्यातील वडवणी तहसील कार्यालयावर आज भव्य मोर्चा काढण्यात आला. मोठ्या संख्येनं धनगर समाज बांधव या मोर्चात सहभागी झाले.

****

ऊसतोडणी कामगार आणि वाहतूक संघटनेच्या वतीनंही आज बीड जिल्हाधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन करण्यात आलं. ऊसतोड कामगारांना तोडणी दर प्रति टन साडे पाचशे रुपये करण्यात यावा, यासह अनेक मागण्यांसाठी हे आंदोलन करण्यात आलं.

****

एकदिवसीय विश्वचषक क्रिकेट स्पर्धेत हैदराबाद इथं आज न्यूझीलंड आणि नेदरलँड यांच्यात सामना सुरू आहे. नेदरलँडनं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण स्वीकारलं. न्यूझीलंडनं ५० षटकांत सात बाद ३२२ धावा केल्या. न्युझीलंडकडून वील यंगनं सर्वाधिक ७० तर कर्णधार टॉम लॅथम आणि रचिन रविंद्र यांनी अनुक्रमे ५३ आणि ५१ धावा केल्या. तर नेदरलँडकडून आर्यन दत्त, पॉल व्हॅन मिकेरेन आणि रोअल्फ व्हॅन डेर मेरवे यांनी प्रत्येकी दोन गडी बाद केले.

****

मुंबई–आग्रा महामार्गावर सोनगीर टोल नाक्याजवळ धुळे पोलिसांनी ४८ लाख ४३ हजार रुपये किमतीचा गुटखा जप्त केला. या प्रकरणी वाहन चालकास अटक करण्यात आली असून त्याच्यासह पाच जणांविरूद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

****

बीड जिल्ह्यातले हुतात्मा सैनिक पांडुरंग तावरे यांच्यावर आज पाटोदा तालुक्यात काकडहिरा इथं लष्करी इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. सिक्कीमध्ये ढग फुटी होऊन तिस्ता नदीला आलेल्या पुरात तावरे यांची छावणी वाहून गेली होती, त्यात त्यांचा मृत्यू झाला.

****